बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

### कोणाला पाडायचे-विजयी करायचे

सांगली : विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाज निर्णायक भूमिका बजावणार असून कोणाला पाडायचे आणि कोणाला विजयी करायचे हे ठरले असल्याचे ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके यांनी सांगलीत मेळाव्यात सांगितले.ओबीसी समाजाची संघटनात्मक बांधणी आणि भविष्यातील ओबीसी आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी कार्यकर्त्यांची बैठक शुक्रवारी हरिप्रिया मंगल कार्यालयात पार पडली. या बैठकीत हाके बोलत होते. यावेळी समन्वयक संजय विभुते, माजी महापौर संगीता खोत, माजी नगरसेवक विष्णू माने, सविता मदने, कविता कोळेकर, राजेंद्र कुंभार, विठ्ठल खोत, जगन्नाथ माळी आदींसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

बीड | रविवार,दि.८ सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक३८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# जरांगेंचे आंदोलन प्रामाणिक नसेल तर..!

## राजेंद्र राऊत: आंदोलनाचा फायदा महाविकास आघाडीला



### फडणवीस बोलावते धनी: जरांगे

दरम्यान आमदार राऊत यांनी मांडलेल्या भूमिकेवर जरांगे यांनीही टीका केली आहे. ते म्हणाले, की राऊत यांच्या तोंडातून येणारा प्रत्येक शब्द देवेंद्र फडणवीस यांचा आहे, फडणवीस हेच त्यांचे बोलावते धनी आहेत, असा प्रत्यारोप केला. आपले आंदोलन कुणा राजकीय पक्षांच्या, दावणीला बांधले गेलेले नसल्याचा खुलासाही जरांगे यांनी केला

सोलापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाच्या प्रश्नावर बार्शीचे भाजपा पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांना पुन्हा आव्हान देत, त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या बाजूने फायदा होण्यासाठी आंदोलनाची ढाल पुढे करीत असल्याचा आरोप केला आहे. जरांगे यांचा मराठा प्रश्नावर आंदोलनात प्रामाणिकपणा नसेल तर त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागेल, इशारा दिला आहे.

जरांगे यांचे आंदोलन सुरू झाल्यानंतर त्यांच्यासोबत सुरुवातीच्या चर्चेत राऊत सहभागी झाले होते. लोकसभा निवडणुकीनंतर काही दिवसांपूर्वी जरांगे यांच्यावर एका कार्यक्रमातून टीका केली होती. आज पुन्हा एकदा बार्शी येथे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात

पान २ वर...

### पवार, ठाकरे, पटोलेंकडून हमीपत्र आणावे

जरांगे यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत राऊत म्हणाले, की मराठा आरक्षण प्रश्न खरोखर सोडवायचा असेल तर जरांगे यांनी अगोदर महाविकास आघाडीमधील शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले यांच्याकडून मराठा ओबीसी आरक्षणाची हमी देणारे पत्र लिहून आणावे. त्यांनी जर तसेच हमीपत्र आणून दाखवले तर आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची लेखी हमीपत्रे घेऊन येऊ. जर महायुतीच्या या तिघा नेत्यांनी मराठा ओबीसी आरक्षणाच्या बाजूने हमीपत्रे दिली नाही तर आपण राजकीय संन्यास घेण्यास तयार आहोत. मनोज जरांगे-पाटील यांनीही महाविकास आघाडीच्या नेत्यांची लेखी हमीपत्रे आणण्याची जबाबदारी घ्यावी, असे आव्हान राऊत यांनी दिले.



# उत्सवातून एकतेची ऊर्जा मिळते

## राजेंद्र मस्के :राशी निवास्थानी श्री गणेशची स्थापना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बुद्धीदाता व कलेचा अधिपती श्री गणेशाचा पारंपारिक गणेश उत्सव देशभरात उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्रात श्री. गणेश उत्सवाच्या माध्यमातून परंपरा व संस्कृतीचे मुळे खोलवर रुजली आहेत. अबाल वृद्ध व अठरा पगड जातीतील माणूस या उत्साहात आदराने व जोमाने सामील होतो. पारंपारिक गणेश उत्सवातून तरुणांच्या बुद्धीला विस्तार व कल्पकतेला वाव मिळतो. नवीन ऊर्जा प्राप्त होते. अशा आनंददायी गणेश उत्सवाच्या निमित्ताने सर्व गणेश भक्तांना मनपूर्वक शुभेच्छा देऊन, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सहकुटुंब विधिवत पूजन



करून, श्री गणरायाची राशी निवास्थानी आपल्या सवंगड्यांच्या साक्षीने स्थापना केली.

यावेळी कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्कृतिक प्रकोष्टचे प्रमोद रामदासी, बालाजी जाधव, लालासाहेब पन्हाळे, मारुतीराव

पान २ वर...

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचाराची घटना

## वाद: दोन सशस्त्र गटातील गोळीबारात पाच जणांचा मृत्यू

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील एका वर्षापासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. या घटानांमध्ये अनेकांचा मृत्यू झाला आहे. अशातच शुक्रवारी कुकी सशस्त्र गटाकडून बिष्णुपूर जिल्ह्यातील माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर रॉकेट हल्ला करण्यात आला. त्यानंतर आज पुन्हा एकदा मणिपूरमध्ये हिंसाचाराची घटना घडली आहे. या घटनेत ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.इंडियन एक्सप्रसने दिलेल्या वृत्तानुसार, आज दुपारच्या सुमारास ही घटना



घडली. कुकी सशस्त्र गटाने आज सकाळी पाच वाजताच्या सुमारास निंगथेम खुनौ भागात राहणाऱ्या मैतेई समाजाच्या एका ६३ वर्षीय वृद्ध नागरिकाची घरात घुसून हत्या केली होती. तसेच त्यांनी त्या परिसरात अंदाधुंद गोळीबारही केला होता. त्यानंतर दुपारी मैतेई सशस्त्र गटाने या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं.यावेळी उफाळलेल्या हिंसाचारात ५ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये तीन संशयित कुकी सशस्त्र गटाचे अतिरेकी तर दोन मैतेई सशस्त्र गटाच्या अतिरेक्यांचा


पान २ वर...

# राणे पिता-पुत्र वायफळ बोलतात त्यांना आवरा

## निर्णय:आ.प्रकाश सोळंकेंचे थेट भाजपाला साकडे

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपाचे नितेश राणे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे केलेल्या कृत्याचा व वक्तव्याचा मी जाहीर निषेध करतो. राणे पिता- पुत्र नेहमीच समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करतात त्यामुळे राणे पिता-पुत्रांना आवर घाला अशी विनंती आपण भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितले.माजलगाव शहरात पत्रकारांशी पुढे बोलताना आमदार सोळंके म्हणाले की,



नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे भाजपाचे नितेश राणे हे एका कार्यक्रमानिमित्त आले होते. परंतु या ठिकाणी त्यांनी मुस्लिम समाजाचे धार्मिक स्थळ असलेल्या मशिदिकडे बंदूक दाखवत बेताल वक्तव्य केले.

या वक्तव्यामुळे समाजात तेढ निर्माण होण्याचे काम होते. त्याचबरोबर राणे पिता-पुत्र राज्यभर वायफळ बोलतात यातून समाजात तेढ निर्माण होऊन कायदा व तू सुव्यवस्था बिघडण्याचे काम होते. त्यामुळे याप्रकरणी मी नितेश राणे यांनी केलेल्या कृत्याचा व वक्तव्याचा निषेध करतो तसेच राणे पिता-पुत्रांना आवर घाला अशी विनंती आपण भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पान २ वर...

## लिंबागणेश येथे पोलिसांचे पथसंचलन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील लिंबागणेश सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभुमी लिंबागणेश येथे आज मयुरेश्वर गणरायाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना सरकार वाड्यात करण्यात आली.या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या हेतुने पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ व उपविभागीय अधिकारी कमलेश मिना यांच्या मार्गदर्शनात नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या नेतृत्वाखाली आज दि.७ शनिवार रोजी दुपारी लिंबागणेश येथे पथसंचलन करण्यात आले.सदर पथसंचलन पोलिस चौकी येथुन सुरूवात होऊन बसस्थानक, हनुमान चौक, वाणी चौक, ढवळे चौक, सरकारवाडा परत पोलिस स्टेशन येथे सांगता झाली. पथसंचलनामध्ये पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकी अंमलदार डोंगरे, राऊत, मुंढे, ढाकणे तसेच ईतर पोस्टचे १७ पोलिस कर्मचारी व २० होमगार्ड सहभागी होते. गणेशोत्सव दरम्यान स्थापनेपासून गणेश विसर्जन पर्यंत कडेकोट पोलिस बंदोबस्त राहणार आहे.

# ऑल इंडिया पँथर सेनेच्या कार्यालयाचे उदघाटन!

## नितीन सोनवणे : कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे योद्धा मनोज दादा जरांगे पाटील व राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार ऍड अविनाश जी गंडले यांच्या हस्ते ऑल इंडिया पँथर सेनेच्या बीड जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोमवार दि.९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता शिवराज पान सेंटरसमोर बडगे बापू बिल्डिंगच्या खाली जगताप कॉम्प्लेक्स येथे संपन्न होणार आहे.



ऑल इंडिया पँथर सेनेच्या माध्यमातून दलित शोषित पीडित आदिवासी मुस्लिम बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी देशात अस्तित्वात असलेल्या मनुवादी व्यवस्थेविरोधात संविधान वाचवण्याचा लढा तीव्र करण्यासाठी जनसामान्यांच्या मूलभूत प्रश्नासाठी आंदोलनात्मक पवित्र घेऊन जनसामान्यांचे जन आंदोलन उभा करण्यासाठी दलित अत्याचार ही राष्ट्रीय आपत्ती सारखी परिस्थिती असून दलित अत्याचार विरोधात आवाज उठवण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून होत आहे. जातीयता ही कोरोनापेक्षा भयानक व्हायरस आहे हा व्हायरस नष्ट करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.तरी बीड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज, फुले,शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, टिपू सुलतान यांच्या विचारावर चालणाऱ्या सर्व कार्यकर्ते पदाधिकारी समाज बांधव यांनी उपस्थित राहावे.असे आव्हान ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी केले आहे.

पाठपुरावा | आ.प्रकाश सोळंकेंनी केला होता तरांकित प्रश्न

# तीस वर्षानंतर पुनर्वसन प्रश्न मार्गी!

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनीधी

धारूर तालुक्यातील सुकळी येथील गेल्या २५ ते ३० वर्षापासुन प्रलंबित असलेल्या पुनर्वसन प्रश्न अखेर मार्गी लागला असून त्यास काल झालेल्या मंत्री मंडळांच्या बैठकीत ११ कोटी ९३ लाख रुपयांच्या निधीस मान्यता मिळाली आहे त्यामुळे गावातील नागरिकांत अंनादाचे वातावरण तयार झाले आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून गावातील नागरिक वेळोवेळी उपोषण करुण हा प्रश्न प्रशासन दरबारी मांडत असताना विधासभेत माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी सुकळी गावच्या पुनर्वसन प्रश्न तरांकीत केला होता. व तो प्रशासन दरबारी वेळोवेळी पाठपुरावा करत प्रश्न लावला. सुकळी गावात सतत ओलावा राहणे, रोग सद्रुष परिस्तिथी राहणे इ कारणामुळे सुकळी गावाचे खास बाब



> गेल्या तीस वर्षापासुन प्रलंबित असलेल्या पुनर्वसन प्रश्न आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी विधानसभेत लावून धरला तसेच वेळोवेळी पाठपुरावा करुण सुकळी गावचे पुनर्वसन प्रश्न मार्गी लागले त्यामुळे गावकऱ्यांचे वतीने प्रकाश दादा सोळंके यांचे मनापासून आभार व्यक्त करतोत.
>
> -संतोष सौंदणकर,सरपंच, सुकळी

म्हणून पुनर्वसन करण्याच्या महसूल व वण विभागाच्या प्रस्तावास मा मंत्री मंडळाच्या दी १६ मे २००७ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार गावचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याचा महसूल व वन विभागाने दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजिच्या मंत्री मंडळांच्या बैठकीत ११ कोटी ९३ लाख रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली.

पान २ वर...

# आधी मैत्री नंतर बेशुद्ध करत खून

## गुन्हेगारी: चार जणांना मारणाऱ्या सीरियल किलर महिलांना अटक

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

आंध्रप्रदेश पोलिसांनी गुरूवारी तीन सीरियल किलर महिलांना तेनाली जिल्ह्यातून अटक केली. या महिलांनी २०२२ पासून तीन महिला आणि एक पुरुष अशी चार जणांची हत्या केलेली आहे. या महिला अनोळखी लोकांशी आधी मैत्री करत असत. मग त्यांना गुंगीचे औषध मिश्रीत पेय प्यायला देत. समोरचा व्यक्ती बेशुद्ध झाल्यानंतर त्याच्याकडील मौल्यवान वस्तूंची चोरी करून त्यांची हत्या केली जाई.जून २०२२ मध्ये सीरियल किलर महिलांनी पहिली हत्या केली होती, अशी माहिती पोलिसांनी दिली. तिघींना नगुर बी. या महिलेचा पहिला खून केला. त्यानंतर आणखी दोघांची हत्या करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते कसेबसे वाचले. १३ जून



रोजी बंदलमुरी गावातील एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. चौकशी केल्यानंतर मृत महिलेचे नाव नगुर बी. असल्याचे समोर आले. या खूनाचा तपास करत असताना पोलिसांना रजनी, व्यंकटेश्वरी आणि रामनम्मा या तीन महिलांची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्यांचा तपास सुरू केला.पोलिसांच्या नोंदीनुसार व्यंकटेश्वरी नामक आरोपी महिला याआधीही काही गुन्ह्यात सामील होती. ३२ वर्षीय व्यंकटेश्वरी तेनाली जिल्ह्यात स्वयंसेवक म्हणून काम करत होती. तसेच कंबोडियामध्ये जाऊन सायबर क्राइम सारख्या गुन्ह्यांसाठी तिने काम केले होते. या महिला गुंगीचे औषध म्हणून सायनाइडचा वापर करत असत. एसी दुरुस्त करणाऱ्या एका मित्राकडून त्या सायनाईड मिळवत असत. पोलिसांनी तीनही महिलांना अटक केल्यानंतर त्यांच्याकडून सायनाईड आणि इतर वस्तूंचा साठा जप्त केला आहे.तेनाली जिल्ह्यातील

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा...
पुण्यभूमी

# माणसाला माणूस जोडण्याचे काम!

## पंकजा मुंडे राहता पंचायत समिती ईमारतीचे लोकार्पण

शिर्डी/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी जनतेसाठी जी स्वप्न पाहिली होती, त्या स्वप्नांच्या मी मंत्री असताना सरकारी योजना तयार केल्या आणि त्यातून विकासाची कामे मार्गी लावली. आम्ही केवळ नवीन इमारती बांधल्या नाहीत तर शासकीय योजनांच्या माध्यमातून माणसाला माणूस जोडण्याचे काम केले, जनसेवेचे हा वसा कधीही सोडणार नाही असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी येथे केले.

सात कोटी रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या राहता पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन आज आ. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मोठ्या थाटात पार पडले, त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. आशुतोष काळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे, शालिनीताई विखे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरे आदी उपस्थित होते.




### साहेबांच्या पश्चात तुमचे आशीर्वाद माझ्यासोबत

आज मुंडे साहेब नाहीत पण त्यांच्या पश्चात तुम्ही माझ्यावर तितकेच प्रेम करत आहात, साहेब नसले तरी आज करोडो लोकांचे आशीर्वाद सतत माझ्यासोबत आहेत.असं अभिवचन आ. पंकजाताईंनी यावेळी दिलं.

पुढे बोलताना आ. पंकजाताई म्हणाल्या, मुंडे साहेबाचा वारसा असल्याने मला समाजासाठी नेहमी चांगलच काम कराव लागत. साहेबांनी आयुष्यभर वंचित, पिडित समाजाची सेवा केली, या घटकांचा विकास व्हावा यासाठी त्यांनी काही स्वप्न पाहिली होती. त्यांच्या पश्चात मंत्री झाल्यावर मी त्यांची स्वप्न सरकारी योजना बनून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, प्रत्येक भागात ग्रामपंचायत कार्यालय, वाडी, वस्ती तांड्यावर मुलभूत सोयी अशी कितीतरी करोडो रूपयांची कामे केली. राज्यात ९८ पंचायत समित्यांना ४२९ कोटी खर्च करून नवीन इमारती दिल्या. महिलांसाठी साडे तीन लाख बचतगट तयार केले.

राहाता पंचायत समितीसाठी देखील तेंव्हा प्रशासकीय इमारत मंजूर करण्यात आली होती. आज या इमारतीने मूर्त स्वरूप धारण केले आहे. तालुक्यातील शेतकरी, सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या प्रशस्त आणि सर्व सुविधायुक्त इमारतीचे आज माझ्या हस्ते लोकार्पण करण्यात आले याचा मला आनंद होत आहे. पदावर असताना केवळ इमारती न बांधता माणसं जोडण्याचे काम आम्ही केले असं त्या म्हणाल्या.

### साईबाबांचे घेतले दर्शन

सकाळी ११.१५ वा. आ. पंकजाताई मुंडे यांचे खासगी विमानाने शिर्डी विमानतळावर आगमन झाले, याठिकाणी माजी खासदार डॉ. सुजय विखे व कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. पंचायत समितीचा कार्यक्रम झाल्यानंतर आ. पंकजाताईंनी शिर्डीत जाऊन श्री साईबाबांचे दर्शन घेतले.

# निवडणुक तोंडावर मोदींना हाबाडा!

## पक्षांतर: कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नसल्याची खंत



अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहराच्या राजकारणात स्वतःचे वलय तयार केले आहे.गेली २० ते २५ वर्ष नगरपालिकेची एकहाती सत्ता आपल्याकडे ठेवण्यात यश मिळाले होते सत्ता ज्यांच्यामुळे मिळाली होती त्या जुन्या निष्ठावंत कार्यकर्ते,ज्यांनी राजकिशोर मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले मोदी यांनी आवाज दिल्यास अर्ध्या रात्री हजर व्हायचे तेच कार्यकर्ते आज ऐन निवडणुकीच्या तोंडावरच राजकिशोर मोदी यांची साथ सोडत भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या गोटात जात असल्याचे दिसत आहेत. कधीकाळी निष्ठावंत असणाऱ्या कार्यकर्त्यांनी सुध्दा साथ सोडली आहे.त्यामुळे राजकिशोर मोदी यांची धाकधूक वाढली आहे. राजकिशोर मोदी यांना माणसाची किंमत नाही त्यांना माणसे सांभाळता येत नाहीत.

गरज सरो वैद्य मरो या म्हणी प्रमाणे जुन्या निष्ठावंतांना जाणीवपूर्वक डावलले जात असल्याने शेकडो कार्यकर्ते साथ सोडून जात आहेत.

राजकिशोर मोदी यांनी आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे.तसेच कान भरणाऱ्या लोकांपासून सावध राहावे.यावरून असे दिसते की नंदकिशोर मुंदडा यांना मोदी यांच्या कडील नाराज कार्यकर्त्यांना आपलंसं करून घेण्यात यश आलेलं आहे. त्यामुळे येणाऱ्या नगरपालिका निवडणूक मध्ये राजकिशोर मोदी यांची दमछाक होणार हे निश्चित आहे.अंबाजोगाई नगर परिषद आपल्याकडे घेण्यासाठी नंदकिशोर मुंदडा यांनी दंड थोपटले आहेत.अंबाजोगाई शहरातील नागरिक सुद्धा राजकिशोर मोदी यांच्या वर नाराज असल्याचे दिसत आहेत. आपल्याकडील नाराज कार्यकर्त्यांची मनधरणी करून होणारी गळती कमी करण्याचे मोठे आवाहन राजकिशोर मोदी यांना आहे त्या मध्ये त्यांना कितपत यश येते ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# योजना कुशल कामाचे पैसे मिळाले!

## बी.एम.पवार:लाभार्थ्यांना मिळाला लाभ

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत बीड जिल्ह्यात लाखो शेतकऱ्यांनी कामे केली होती परंतु सहा महिन्यांपासून कुशल कामाचे पैसे मिळाले नव्हते सदरील लाभार्थ्यांना पैसे मिळाले पाहिजे यासाठी राज्याचे कृषी मंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे साहेब यांनी पाठपुरावा केला होता यामुळे सदरील पैसे मिळाले आहेत त्यामुळे लाभार्थी लोकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे अशी माहिती ओबीसी समाजाचे नेते तथा सेवालाल सेना संस्थापक अध्यक्ष बी एम पवार यांनी म्हटले आहे.

या संदर्भात अधिक माहिती अशी की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात लाखो शेतकऱ्यांनी विहीर आणि अन्य योजनेचा लाभ घेतला होता. सदरील कामे होऊन सहा ते सात महिन्याचा कालावधी होऊनही कुशल कामाचे पैसे मिळाले नव्हते त्यामुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला होता. सदरील शेतकऱ्यांना कुशल कामाचे पैसे मिळावेत यासाठी राज्याचे कृषी मंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे साहेब यांना पंधरा दिवसांपूर्वी निवेदन सादर केले होते, थोड्याच दिवसात कुशल कामाचे पैसे मिळवून देण्याचे अभिवचन मंत्रीमहोदयांनी दिले होते.

शेतकऱ्यांच्या कुशल कामाचे पैसे मिळावेत यासाठी राज्याचे कृषी मंत्री आदरणीय धनंजय मुंडे साहेब यांनी अथक परिश्रम घेतले होते. ऐन सणासुदीच्या काळात बीड जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना कुशल कामाचे पैसे मिळवून दिल्यामुळे शेतकरी वर्गात समाधान व्यक्त केले जात असुन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे साहेब यांचे आभार मानले जात आहे अशी माहिती बी एम पवार यांनी दिली आहे.

# राष्ट्रवादीतून राष्ट्रवादीत केला प्रवेश!

## पक्षांतर :सिताराम क्षीरसागरांची सोडचिट्टी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटातील जिल्हा उपाध्यक्ष सिताराम क्षीरसागर यांनी या पक्षाला सोड चिट्टी देत आपल्या समर्थका सह आमदार प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश केला असून त्यांचे स्वागत आमदार प्रकाश सोळंके यांनी केले आहे.

तालुक्यातील शरद पवार पक्षाचे नेतृत्वावर नाराजी व्यक्त करीत क्षीरसागर यांनी या पक्षाला सोडते दिले असेल आमदार सोळंके यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे ठरवले आहे. त्यांच्या समर्थकांसह झालेल्या प्रवेशानंतर आमदार सोळंके यांनी त्यांना शुभेच्छा देत लवकरच आपली एखाद्या पदावर नियुक्ती करण्यात येईल असे आश्वासन दिले तसेच त्यांच्यासोबत गेलेल्या समर्थकांनाही प्रकाश सोळंके यांनी आपण कोणतेही काम घेऊन या ते आपण करू असे आश्वासन दिले या प्रवेशामुळे क्षीरसागर यांचे सर्व स्तरातून स्वागत होत असून आपण एकनिष्ठ पणे आमदार सोळंके यांच्या नेतृत्वाखाली काम करून पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी आश्वासन दिले. त्यांच्या या जाण्यामुळे शरद पवार गटाचे नुकसान झाले आहे. अजित पवार गट यांच्या पक्षा मध्ये जाहिर प्रवेश क्षीरसागर यांच्यासोबत रामा सातपुते, दिना कांबळे गोविंद थोरात गोपिनाथ क्षिरसागर रामा गायकवाड, विश्वाम क्षीरसागर भिमराव कांबळे, नितीन क्षीरसागर, सुग्रीव कांबळे, वैभव क्षिरसागर प्रभाकर थोरात चिकू सातपुते, सुमित क्षिरसागर, रामा कांबळे, भारत कांबळे तोफिक लाला, पाशा भाई सुलतान, सचिन कांबळे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते हजर होते



# समाजात वावरतांना मुलींनी दक्ष राहीले पाहीजे -शेंडगे

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

समाजात वावर असतांना कोणत्या आमिषाला बळी न पडता मुलीने स्वतःच्या संरक्षणासाठी दक्ष राहीले पाहीजे, असा सल्ला युसूफवडगाव येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी मुलींना दिला. तालुक्यातील आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक विद्यालयात मुलींच्या संरक्षणाबाबत मार्गदर्शन करताना दि. ५ रोजी ते बोलत होते.

जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी पोलीस प्रशासनामार्फत मुलींना मार्गदर्शन करण्याच्या सूचना सर्व शाळेतील मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. त्या सूचनेची अंमलबजावणी करीत शाळेच्या वतीने युसुफवडगाव येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. यावेळी मुलींनी स्वसंरक्षणाबाबत घ्यावयाच्या काळजीबाबत शेंडगे यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. मुलींनी कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी संपर्क ठेवू नये. शाळेतील मुलगा किंवा शाळे बाहेरील व्यक्ती त्रास देत असेल तर गप्प न राहता वेळीच आपल्या आई -वडीलांना व शिक्षकांना सांगावे. यासह त्यांनी इतर सुचना यावेळी मुलींना दिल्या. यावेळी संस्थेचे सचिव प्रा. जयजीत शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा. एन. के. हजारे यांची मंचावर उपस्थिती होती.

# पाटेगाव येथे शिक्षक दिन उत्सहात

## धोरण: कौशल्या विद्यामंदिर,कनिष्ठ महाविद्यालयात उपक्रम

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित कौशल्या विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय पाटेगाव शाळेत काल डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्सहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्यध्यापक श्री निलेशजी गायकवाड सर,प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या सहशिक्षिका श्रीमती स्वप्नजा पाटील,विद्यार्थी मुख्याध्यापक म्हणून इयत्ता १० वी चा विद्यार्थी अक्षय थोरात यांची प्रमुख उपस्थित होती.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर इयत्ता ९ वी च्या विद्यार्थिनींनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत गीत गाऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष,प्रमुख पाहुणे,विद्यार्थी मुख्याध्यापक व शाळेतील सर्व शिक्षक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर चघउङ अहमदनगर व ज्ञानसागर कॉम्पुटर पैठण चे संस्थापक अध्यक्ष श्री.नितीनजी मोरे सर यांच्या वतीने मागील वर्षापासून दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार यावर्षी शाळेचे आदर्श शिक्षक श्री नंदकिशोर पातकळ सर यांना देण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विषयी यावर आपले मनोगत व्यक्त केले.यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करतांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील विद्यार्थीनी कु.दसपुते प्रांजली व सय्यद फिजा यांनी केले तर आभार शाळेतील विद्यार्थिनी कु.श्रुती रावस यांनी व्यक्त केले.यावेळी शाळेतील सहशिक्षक नंदकिशोर पातकळ,बालाजी नलभे,,विजय सपकाळ,सोन्याबापू पालवे,नारायण औटे,भाऊसाहेब गायकवाड,अमोल

गायकवाड,प्रकाश कामडी,अनिता तारख आकेश दांडेकर,प्रविण काळे,शितल थिटे,अस्मिता भिसे,स्वप्नील गव्हाणे,अक्षय शेळके ,निखील पापुलवार,सतिष पवार,विठ्ठल त्रिभुवन,महेश गायकवाड,इत्यादी उपस्थित होते.

# पोलीस प्रशासनाकडून शांतता बैठक!

## कार्यक्रम : सन-उत्सवा निमित्ताने प्रशासन सज्ज

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या वतीने श्रीगणेश उत्सव तसेच ईद.ए.मिलाद कार्यक्रमानिमित्त दि.५ रोजी जिल्हास्तरीय शांतता व सद्भावना बैठकीचे आयोजन छत्रपती संभाजीनगर शहरातील सुर्या लॉन्स येथे करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड हे होते.तसेच अप्पर पोलीस अधीक्षक सुनील कृष्णा लांजेवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील बैठकीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पोलीस पाटील तसेच श्रीगणेश उत्सव समितीचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सोयगाव पोलीस ठाणे शहरातील व हद्दीत गलवाडा,रामपुरातांडा,वर ठाण,बनोटी,गोंदेगाव येथील पोलीस पाटील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील सोयगाव होमगार्ड पथकातील होमगार्ड योगेश बोखारे,विशाल घन,व अंतुल पगारे भागचंद राठोड,धनराज पाटील,तसेच होमगार्ड योगेश बोखारे,विशाल घन हे सोयगाव येथे होमगार्ड म्हणून कार्यरत असून कर्तव्या व्यतिरिक्त इतर वेळी ही कायमस्वरूपी पोलीस प्रशासनाला मदत करणे,गावात साजरे होणाऱ्या सर्व जातीधर्माच्या सण उत्सवात सहभागी होऊन गावात शांतता अबाधित ठेवणे,पोलीस ठाण्याशी कायम संपर्कात राहणे आदी कामांची दखल घेऊन सोयगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल तसेच सोयगाव बिट जमादार राजू बरडे,गजानन दांडगे,रवींद्र तायडे,यांच्या शिफारशीनुसार होमगार्ड योगेश बोखारे,विशाल घन,व अंतुल पगारे यांना पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड तसेच अप्पर पोलीस अधीक्षक सुनील कृष्णराव लांजेवार यांच्या हस्ते प्रशंसापत्र देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पोलीस पाटील तसेच सामाजिक कार्यकर्ते व पोलीस अधिकारी कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी यांना पोलीस प्रशंसापत्र मिळाल्याबद्दल सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,गजानन दांडगे,रवींद्र तायडे,अजय कोळी,सोयगाव होमगार्ड पथकाचे तालुका समादेशक अधिकारी संदीप सुरडकर,अंशकालीन लिपिक कृष्णा शेवाळकर,किरण सपकाळ,आदींनी यांना शुभेच्छा दिल्या.




## आ पंकजा मुंडे राहाता पं समितीच्या इमारतीचे लोकार्पण

# पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा

अप्पासाहेब मकासरे/राहुरी

संसार जरी मोडुन पडला तरी मोडला नाही कणा पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा असे म्हणाले मुंढे साहेब आज नाही परंतु तुमच्या सर्वांच्या डोळ्यामध्ये मला त्यांचे आशीर्वाद दिसतात असे प्रतिपादन राज्याचा माजी ग्रामविकासमंत्री आ पंकजाताई मुंढे यांनी केले. राहाता पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन त्यांचा शुभहस्ते करण्यात आले त्या पुढे म्हणाल्या की नवीन प्रशासकीय इमारतीत येणाऱ्या नागरिकांना सन्मानपूर्वक वागणूक देण्याचे काम अधिका-यांनी करावे अशी अपेक्षा मी करते. यावेळी राज्याचे महसूलमंत्री पशुसंवर्धन दुग्धविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की पंचायत समितीच्या इमारती ग्रामीण विकासाचे केंद्रबिंदू आहेत या विकासाच्या मंदिराचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष मा आमदार शिवाजीराव कर्डिले व अण्णासाहेब म्हस्के यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



नवीन इमारतीच्या माध्यमातून नागरिकांची कामे अधिक जलदगतीने करण्यावर प्रशासनाचा भर राहणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी प्रास्ताविकातून केले. यावेळी आ आशुतोष काळे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील मा खासदार डॉ सुजय दादा विखे-पाटील अप्पर जिल्हाधिकारी डॉ बाळासाहेब कोळेकर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जालिंदर पठारे आदी उपस्थित होते.

# अंगणवाडीमध्ये राष्ट्रीय पोषण सप्ताह

## योजना:महिला महाविद्यालयात राबविला उपक्रम




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे नेहमी सामाजिक बांधिलकी जपत असते व सामाजिक उपक्रम राबवीत असते .आज दि. ५ । ९ । २४ रोजी या महाविद्यालयाच्या गृहविज्ञान विभागातर्फे राष्ट्रीय पोषण सप्ताहानिमित्त परळी येथील कंडक्टर कॉलनीत असलेल्या अंगणवाडीमध्ये विविध प्रकारच्या पोषक फळांचे वाटप करण्यात आले. तसेच विभाग प्रमुख डॉ. रागिणी पाध्ये त्यांनी या भागातील गर्भवती स्त्रियांना स्वतःच्या व बाळाच्या सुदृढ स्वास्थ्यासाठी पोषण आहाराविषयक महत्वाचे मार्गदर्शन केले . गर्भवती स्त्रियांचे पोषक आहाराने ओटी भरणही करण्यात आले. या कार्यक्रमासाठी गृहविज्ञान विभागातील सर्व विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती .



## ममता सरकारची चूक राज्यपालांनी दिली माहिती

# अपराजिता बिल खोळंबले

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोलकाता :** कोलकात्याच्या आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये तृतीय वर्षात शिकणाऱ्या प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचार व खूनप्रकरणी संपूर्ण देशात रोष वाढत आहे. सध्या प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले असून विविध प्रकारे तपास सुरू आहे. दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी जनतेचा वाढता प्रक्षोभ लक्षात घेता ३ सप्टेंबर रोजी 'अपराजिता बिल' प. बंगाल विधानसभेत सादर केले हे एकमताने पारितही झाले. या विधेयकाचे कायद्यात रूपांतरित व्हावे यासाठी ते राज्यपालांकडे पाठवण्यात आले. दरम्यान, आता याप्रकरणी ममता सरकारच्या क्षुल्लक चुकीमुळे अपराजिता विधेयक खोळंबण्याची चिन्हे दिसत आहेत, दस्तरखुद्द प.बंगालचे राज्यपाल आनंद बोस यांनी याबाबत माहिती दिली आहे. कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रूपांतरण करताना तांत्रिक बाबींचा विचार करत त्यावर अहवाल सादर करावा लागतो, पण अपराजिता विधेयक विधानसभेत मंजूर केल्यानंतर ते राज्यपालांकडे पाठवताना त्यात तांत्रिक अहवाल जोडण्यात आला नाही व याच कारणांमुळे हे विधेयक खोळंबले आहे. विधानसभेत मंजूर झाल्यानंतर हे विधेयक राज्यपालांकडे पाठवण्यात आले आहे. येथून पास झाल्यानंतर हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाईल, तेथून मंजूर झाल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर करता येईल.

### विधेयकात तांत्रिक अहवाल नाही

राज्यपालांनी जारी केलेल्या निवेदनानुसार महिला सुरक्षेशी संबंधित या महत्त्वपूर्ण विधेयकाबाबत ममता सरकारने कोणताही गृहपाठ केला नाही. राज्य सरकारने यापूर्वीही असे केले आहे. विधानसभेने मंजूर केलेल्या अनेक विधेयकांचे तांत्रिक अहवाल राजभवनात पाठवले जात नाहीत. त्यामुळे २०२१, २०२२ व २०२३मधील अनेक महत्त्वाची विधेयके अजूनही प्रलंबित आहेत. यासाठी ममता सरकार मग राज्यपालांनाच जबाबदार धरते. ममता सरकारच्या या वृत्तीमुळे राज्यपाल बोस संतापले आहेत.

## स्पेनमधील मालोर्का बेटावरील गुहेत मिळाला जुना ब्रिज

देशोन्नती वृत्तसंकलन

**माद्रीद :** स्पेनमध्ये नावाचे एक बेट आहे. येथील एका गुहेत पाण्यात बुडालेला ब्रिज मिळाला आहे. हा ब्रिज ५६०० वर्षे जुना आहे. यामुळे या मालोर्का गुहेत प्राचीन काळात लोकांचे वास्तव्य होते हे स्पष्ट झाले आहे. कालौघात तापमान वाढत गेल्याने समुद्राची पातळी वाढली आणि हे ठिकाण पाण्यात बुडाल्याचेही समोर आले आहे. भविष्यात अशाचप्रकारे अनेक शहरे पाण्यात बुडालेली असणार आहेत. ही गुहा प्रत्यक्षात २००० साली शोधण्यात आली होती. त्यानंतर वैज्ञानिकांना या गुहेत पाणी भरल्याचे दिसून आले होते. स्कूबा डायव्हिंग करत पाण्याखालील ब्रिज शोधण्यात आला आहे.



ही गुहा भूमध्यसमुद्रानजीक आहे. यात लाइमस्टोन म्हणजेच चुनादगडाने निर्मित २५ फूट लांब ब्रिज आहे. पूर्वी हा ब्रिज ४४०० वर्षे जुना असल्याचा अंदाज बांधण्यात आला होता. युनिव्हर्सिटी ऑफ साउथ फ्लोरिडाचे जियोलॉजिस्ट बोगडान ओनैक यांनी मागील अध्ययनात सांगण्यात आलेले वय हे या ब्रिजच्या आसपास मिळालेल्या भांड्यांच्या तुकड्यांवर आधारित होते; परंतु आता आम्हाला याचे अचूक वय कळले असल्याचे म्हटले आहे.

## तिकिट कापल्यावर नाराज माजी मंत्री कंबोज यांचे मुख्यमंत्र्यांकडे दुर्लक्ष

देशोन्नती वृत्तसंकलन

**चंदीगढ :** हरियाणा विधानसभा निवडणुकीपूर्वी राजकीय हालचालींना वेग आला आहे. तिकिट वाटपावरून नाराज झालेल्या अनेक भाजप नेत्यांनी पक्ष सोडण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, हरियाणाच्या माजी मनोहरलाल खट्टर सरकारमध्ये मंत्री असलेले कर्णदेव कंबोज यांनी तिकिट न मिळाल्याने नाराजी व्यक्त करत पदाचा राजीनामा दिला. अशात मुख्यमंत्री नायबसिंग सैनी स्वतः त्यांची समजूत काढण्यासाठी आले. मात्र, त्यांना यात अपयश आले. या दरम्यानचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

तिकिट न मिळाल्याने नाराज झालेल्या कंबोज यांनी पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला. त्यांची समजूत घालण्यासाठी आलेल्या मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांनी हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. कंबोज हात जोडून पुढे सरकले. पक्षावर नाराज असलेले मुख्यमंत्री नायब सैनी आणि आमदार सुभाष सुधा त्यांना भेटण्यासाठी प्रत्यक्षात कंबोज यांच्या गावी पोहोचले होते. मात्र, कंबोज यांनी त्यांच्या समोर नाराजी व्यक्त करत आता मी भाजप पक्षाला हरविण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले.



## मिशेल बार्निअर फ्रान्सचे नवे पंतप्रधान

देशोन्नती वृत्तसंकलन

**पॅरिस :** फ्रान्सच्या नव्या पंतप्रधानांची अखेर निवड झाली आहे. फ्रान्समधील निवडणुका झाल्याच्या काही आठवड्यांनंतर व प्रदीर्घ चर्चा करून त्या देशाचे राष्ट्रपती इम्यॅनुअल मॅक्रॉ यांनी मिशेल बार्नियर यांची पंतप्रधान पदावर नियुक्ती केली आहे. पूर्वी ब्रेक्झिटच्या चर्चेत सहभाग घेणाऱ्या बार्नियर यांच्या नावावर मॅक्रॉ यांनी शिक्कामोर्तब केले असल्याचे राष्ट्रपती भवनाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



देशाची सेवा करण्यासाठी एकात्मिक सरकार स्थापन करण्याची जबाबदारी बार्नियर यांच्यावर सोपवण्यात आली आहे. ७३ वर्षीय बार्नियर यांनी २०१६ ते २०२१ पर्यंत युरोपीयन युनियनमधून ब्रिटन बाहेर पडण्याच्या अर्थात ब्रेक्झिटच्या चर्चेचे नेतृत्व केले होते. १९५१ मध्ये जन्मलेले बार्नियर वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी सोवाई येथून खासदार म्हणून विजयी झाले होते. एक राजकीय नेता म्हणून फ्रान्स सरकारमध्ये त्यांनी विविध पदांवर काम केलेच आणि ते युरोपीय संघाचे आयुक्त म्हणूनही निवडून आले होते.

## अमेरिका, ब्रिटन यांच्यात एआय करार

देशोन्नती वृत्तसंकलन

**वॉशिंग्टन :** अमेरिका, ब्रिटन आणि युरोपियन महासंघ यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधातील (एआय) करार केला आहे. हा या विषयावरचा जगातील प्रथमच आंतरराष्ट्रीय आणि कायदेशीररित्या बंधनकारक करार आहे. या करारासाठी गेल्या कित्येक वर्षांपासून पूर्वतयारी करण्यात येत होती. मे २०२४ मध्ये या कराराच्या प्रारुपाला मान्यता देण्यात आली होती. गुरुवारी त्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे अत्याधुनिक तंत्रज्ञान असून त्याचे जसे अनेक उपयोग आहेत, तसे त्यापासून अनेक धोकेही संभवतात. या धोक्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठीच्या तरतुदी या करारात आहेत. मानवाधिकार आणि कायद्याचे राज्य या संकल्पनांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे बाधा पोहचू नये, याची दक्षता घेण्याची आवश्यकता असल्याने हा करार करण्यात आला आहे. कराराचे प्रारुप तयार करण्यापूर्वी ५७ देशांची प्रशासने आणि तज्ज्ञांची चर्चा करण्यात आली आहे. हे तंत्रज्ञान मूठभर देशांच्या हाती असू नये. त्यावर कोणाचा एकाधिकार राहू नये. या तंत्रज्ञानाचा लाभ संपूर्ण जगाला व्हावयास हवा, अशी मागणी भारतासह अनेक देशांनी केली आहे.

### ५७ देशांची झाली चर्चा



याशिवाय अनेक देशांनी या तंत्रज्ञानाचा उपयोग कसा केला जावा, यासंबंधी अनेक सूचना केल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग एखाद्या व्यक्तीची बदनामी करण्यासाठी होऊ शकतो. तसेच समाजाची दिशाभूल करण्यासाठीही केला जाऊ शकतो. त्यामुळे या तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच या तंत्रज्ञानाचा दुरुपयोगापासून मानवाधिकार आणि खासगीत्वाचा अधिकार यांचे संरक्षण करणे ही बाब महत्त्वाची ठरते. याच बाबीचा प्रामुख्याने विचार या करारात करण्यात आला आहे, अशी माहिती ब्रिटनच्या सरकारने दिली आहे.

## भटक्या श्वानास बांधून फरफटत नेणाऱ्याला अटक

**गोवा :** मुक्या जनावरांना त्रास देण्यात काही जणांना पाशवी आनंद मिळतो. नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार, अशोक पन्हाळकर (सध्या राहणारे खोर्ली म्हापसा व मूळचे बेळगाव कर्नाटक) यांनी ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४:१५ वाजता एका भटक्या श्वानास आपल्या मोटरसायकलला बांधून अनेक किलोमीटर फरफटत नेले. रस्त्यावर घासले गेल्यामुळे त्या मुक्या जनावरास गंभीर जखमा झाल्या व यातच त्याचा मृत्यू झाला. शेवटी अशोक पन्हाळकर यांनी मृत्युमुखी पडलेल्या या भटक्या श्वानाचा मृतदेह तेथेच रस्त्याशेजारी टाकून दिला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, एका व्यक्तीने अशोक पन्हाळकर यांच्या विरोधात एफआयआर दाखल केली.


## चिनी प्राण्यांमध्ये आढळले धोकादायक विषाणू

### मानवजातीला मोठा धोका

देशोन्नती वृत्तसंकलन

**बिजींग :** नुकत्याच आलेल्या एका संशोधन अहवालानुसार, चीनमध्ये असलेल्या फर प्राण्यांमध्ये धोकादायक विषाणू आढळून आले आहेत. संशोधनात सुमारे १२५ विषाणू ओळखले गेले आहेत जे मानवजातीसाठी अत्यंत धोकादायक आहेत. मानवी लोकसंख्येमध्ये या विषाणूंचा प्रसार होण्याच्या जोखमीबद्दल चिंता वाढली आहे. व्हायरसवर पाळत ठेवण्याची तातडीची गरज असल्याचे विषाणूशास्त्रज्ञ एडवर्ड होम्स यांनी म्हटले आहे.

संशोधनात या पूर्वीच्या अज्ञात ३६ विषाणूंचा समावेश आहे, तर ३९ विषाणूंची अती धोकादायक म्हणून नोंद केली गेली आहे. या विषाणूंचा संसर्ग झपाट्याने पसरू शकतो असा इशाराही देण्यात आला आहे. नेचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेले संशोधन २०२१ ते २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. यादरम्यान, विषाणूंच्या संसर्गाने मरण पावलेल्या ४६१ प्राण्यांवर संशोधन करण्यात आले. ज्यात मिंक, कोल्हा, रॅकून कुत्रे, ससे आणि कस्तुरी या प्राण्यांचा समावेश आहे. संशोधकांना या प्राण्यांमध्ये सात प्रकारचे कोरोनाव्हायरसदेखील आढळले आहे.



**मैदुगुरी :** नायजेरियात बोको हरामच्या दहशतवाद्यांनी हल्ला करत १०० हून अधिक जणांना ठार केले आहे. दहशतवाद्यांनी बाजार, सामूहिक प्रार्थना करणाऱ्या लोकांवर आणि घरांमध्ये गोळीबार केल्याचा दावा स्थानिक रहिवाशांनी केला आहे. ५० हून अधिक दहशतवादी मोटरसायकल्सवरून योबे प्रांताच्या तारमुवा परिषद क्षेत्रात शिरले आणि त्यांनी बेछूट गोळीबार केल्याची माहिती योबे पोलीस विभागाचे प्रवक्ते डुंगस अब्दुल करीम यांनी दिली आहे.

## गोमांस विक्रीप्रकरणी मुस्लीम व्यक्तीला मारहाण

### १९ जणांवर गुन्हा, दोघांना अटक

वृत्तसंस्था

**समस्तीपूर :** गोमांस विकल्याच्या संशयावरून काही अज्ञात तरुणांनी मुस्लीम व्यक्तीला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बिहारच्या समस्तीपूरमध्ये ही घटना घडली. याप्रकरणी एकूण १९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटकही करण्यात आली आहे. १६ ऑगस्ट रोजी ही घटना घडली. या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर हा संपूर्ण प्रकार उजेडात आला.

पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, १६ ऑगस्ट रोजी दुपारी रहिमाबाद गावातील ५४ वर्षीय सरजुलुम कुरेशी नामक व्यक्ती त्याचे मटणांचे दुकान बंद करून घरी जात होता. त्यावेळी बांगरा रेल्वे क्रॉसिंगजवळ अचानक काही तरुणांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याच्याजवळ असलेल्या पिशवीत काय? अशी विचारणा करण्यात आली आहे. त्यानंतर तू गोमांस विकतो, असे म्हणत त्यांना मारहाण करण्यात आली. तसेच त्याच्या जवळ असलेले साडेसहा हजार रुपयेसुद्धा त्यांनी हिसकून घेतले.

## नगरविकास खाते तुमचे ऐकणार का?

### आदित्य ठाकरेंचा फडणवीसांना सवाल

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेत १ हजार ८४६ लिपिकपदांसाठी भरती होणार आहे. याची प्रक्रिया सुरू असली तरी, यापदांबाबत ठेवण्यात आलेल्या अटी-शर्तींवरून मोठ्याप्रमाणावर टीका केली जात आहे. हे ध्यानी घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र लिहिले आहे. यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत, नगरविकास खाते तुमचे ऐकणार का? असा खोचक प्रश्न केला आहे. ही पदे थेट भरतीद्वारे भरली जाणार आहेत. यासाठी २० ऑगस्ट २०२४ पासून उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ९ सप्टेंबर आहे.

## ७० तरुणींच्या न्यूड व्हिडिओने खळबळ!

**जबलपूर :** मुलींना सतर्क करणारी धक्कादायक बातमी जबलपूरमधून समोर आली आहे. याठिकाणी शासकीय कन्या महाविद्यालयातील ७० हून अधिक विद्यार्थिनींना व्हॉट्सपवर अश्लील आणि न्यूड व्हिडिओ पाठवले जात आहेत. बहुतांश व्हिडिओंमध्ये या विद्यार्थिनींचे चेहरे दिसत आहेत. या घटनेने पोलिसांपासून पीडित मुलींसह महाविद्यालयात खळबळ उडाली आहे.

## कोलेस्टेरॉलमुळे कर्करोगाचा धोका

वृत्तसंस्था


**लंडन :** कोलेस्टेरॉलमुळे केवळ हृदयविकाराचाच धोका संभवतो असे नाही. मानवी शरीरातील कोलेस्टेरॉलच्या उपउत्पादनामुळे एस्ट्रोजेनसारख्या संप्रेरकांची वाढ होते व परिणामी अनेक प्रकारचे स्तनांचे कर्करोग यामुळे होतात, असे एका अभ्यासात दिसून आलेले आहे. डुक कर्करोग संस्थेच्या वैज्ञानिकांना असे दिसून आले की, स्टॅटिनसारखी कोलेस्टेरॉल प्रतिबंधक औषधे एस्ट्रोजेनच्या रेणूंचा परिणाम नष्ट करतात. या अभ्यासाने प्रथमच कोलेस्टेरॉलचे उच्च प्रमाण व विशेषतः रजोनिवृत्तीनंतर स्तनांचा कर्करोग यांचा संबंध जोडला गेला आहे. आहारातील बदलांमुळे

लठ्ठपणा व स्तनांचा कर्करोग यांचा संबंध दाखवणारे अनेक अभ्यास आतापर्यंत झाले असून, कोलेस्टेरॉलवाढीमुळे स्तनांच्या कर्करोगास अप्रत्यक्षपणे मदत होत असली, तरी ते नेमके कसे घडून येते हे माहीत नव्हते, त्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे, असे औषधशास्त्र व कर्करोग जीवशास्त्र विभागाचे डुक येथील अध्यासन प्रमुख डोनाल्ड मॅकडोनेल यांनी सांगितले.

### एस्ट्रोजेनमुळे वाढतो स्तनांचा कर्करोग

स्तनांच्या ७५ टक्के कर्करोगात एस्ट्रोजेनचे वाढते प्रमाण हे कारण असते. २७ हायड्रॉक्सिकोलेस्टेरॉल किंवा २७ एचसी हा पदार्थ अगदी एस्ट्रोजेनसारखी भूमिका पार पाडतो. उंदरांवर करण्यात आलेल्या प्रयोगात २७ एचसी या घटकाचा संबंध स्तनांच्या कर्करोगाशी मोठा प्रमाणात असल्याचे दिसून आले. एस्ट्रोजेनविरोधी टॅमोक्सिफेन या औषधाची परिणामकारकताही त्यामुळे कमी होत जाते.

### एस्ट्रोजेनसारख्या संप्रेरकांची वाढ



कोलेस्टेरॉलला आळा घालून अशा प्रकारच्या कर्करोगाची शक्यता कमी करता येते, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

## सकारात्मक विचारसणीच्या नावाने राजकारण नको

### मायावतींनी 'त्या' घटनेचा केला निषेध

देशोन्नती वृत्तसंकलन

**लखनौ:** बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्षा मायावती यांनी महाराष्ट्रातील सिंधुदुर्गात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या कोसळल्याच्या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. 'एक्स' या सोशल मीडिया साइटवर पोस्ट करताना त्यांनी लिहिले की, राजे, महाराज, संत, गुरू आणि महापुरुष कोणत्याही समाजाचे आणि धर्माचे असले तरी नकारात्मक विचार नसून सकारात्मक विचारसरणीच्या नावाखाली कोणतेही राजकारण करू नये,' असे म्हणत त्यांनी या घटनेचा निषेध केला आहे.



मायावतींनी पोस्टमध्ये पुढे लिहिले आहे की, त्यांचे पुतळे बसवणे आणि त्यांचे नाव देणे इत्यादींचाही सकारात्मक दृष्टिकोनातून उपयोग झाला पाहिजे आणि त्यामागे कोणत्याही प्रकारचा द्वेष आणि राजकीय स्वार्थ दडलेला नसावा, जो आता दिसत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे.

## स्वयंसेवक संघर्षग्रस्त मणिपूरमध्ये खंबीरपणे उभे

### मोहन भागवत यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन

**मणिपूर :** मणिपूरमध्ये शिक्षणाच्या चळवळीचे नेतृत्व करणारे आणि शिक्षणाची पाळेमुळे घट्ट करून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य बदलणारे शंकर दिनकर काणे यांचे जन्मशताब्दी वर्ष ५ सप्टेंबर रोजी साजरे झाले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत उपस्थित होते. त्यांनी यादरम्यान अनेक विषयांवर भाष्य केले. मणिपूरमध्ये आव्हानात्मक परिस्थिती असून सुरक्षेची कोणतीही हमी नसतानाही संघटनेचे स्वयंसेवक संघर्षग्रस्त मणिपूरमध्ये खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन मोहन भागवत यांनी केलेत.

शंकर दिनकर काणे यांच्या कार्याचे स्मरण करून संघप्रमुख म्हणाले, १९७१ सालापर्यंत काणे यांनी मुलांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत केले, विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात आणले आणि त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली.

## डील करण्याशिवाय पर्याय नव्हता!

### रॉ चे तत्कालीन प्रमुख दुलत यांचा दावा

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या आयसी ८१४ :द कंदाहार हायजॅक या वेबसीरिजमुळे २५ वर्षापूर्वीची विमान अपहरणाची घटना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. नेपाळची राजधानी काठमांडूवरून दिल्लीला येण्यासाठी इंडियन एअरलाइन्सच्या विमानाने उड्डाण केले, पण हवेत असतानाच हे विमान हायजॅक करण्यात आले होते. या वेबसीरिजमुळे अनेक मुद्यांवर पुन्हा एकदा वादविवाद सुरू झाला आहे. तत्कालीन सरकारने ती परिस्थिती कशी हाताळली? वेगवेगळ्या तपास यंत्रणांचा त्यात सहभाग असे अनेक मुद्दे आहेत. १९९९ साली आयसी ८१४ विमानाचे अपहरण झाले. त्यावेळी एएस दुलत रॉ चे प्रमुख होते. त्यांनी डील करण्याशिवाय पर्याय नव्हता असे म्हटले.



## २० रूपयांची लाच घेणाऱ्या हवालदाराला अटकेचे आदेश

देशोन्नती वृत्तसंकलन

**भागलपूर :** लाच घेणे हा फौजदारी गुन्हा आहे. आपल्या आजू-बाजूला लाच प्रकरणाच्या बऱ्याच घटना बघत असतो. बिहारच्या भागलपूरमधून एक विचित्र लाच प्रकरण समोर आले आहे. हे प्रकरण आहे ३४ वर्षांपूर्वीचे आणि लाच घेतली होती २० रुपये. ही लाच घेतली होती एका माजी हवालदाराने. न्यायालयाने हवालदाराला अटक करण्याचे आदेश दिले आहेत.

माहितीनुसार, बिहारमधील बराहिया येथील हवालदार सुरेश प्रसाद सिंह सहरसा रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर होता. सिंह याने ६ मे १९९० रोजी महेशखुंट येथील रहिवासी असलेल्या सीता देवी या स्टेशन प्लॅटफॉर्मवर भाजी घेऊन जात असताना थांबवले. सिंह याने देवी यांच्याकडून पैशांची मागणी केली. यावेळी देवी यांनी त्याला २० रुपये दिले. ते पैसे त्याने आपल्या खिशात ठेवले, पण त्याच्यावर बारीक लक्ष ठेवून असलेल्या तत्कालीन रेल्वे स्थानक प्रभारींनी त्याला रंगेहात पकडले आणि लाचेची रक्कम तात्काळ जप्त करण्यात आली.


दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# प्राथमिक शिक्षक बँकेला ८ कोटी ६३ लाखांचा नफा

## सात टक्के लाभांशाची शिफारस : बाळासाहेब सरोदे

देशोन्नती वृत्तसंकलन

**अहमदनगर:** अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची १०५ वी सर्वसाधारण सभा रविवारी सकाळी ११ वा. सुखकर्ता लॉन्स, कल्याण रोड, येथे होत आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात शिक्षक बँकेला ८ कोटी ६३ लाखांचा नफा झाला असून सभासदांना सात टक्के प्रमाणे लाभांश देण्याची शिफारस सर्वसाधारण सभेसमोर ठेवली आहे. शिक्षक बँकेच्या आज रोजी १५०० कोटी दरम्यान ठेवी असून ११०० कोटींचे कर्ज वितरण झाले आहे. गेल्या आठ वर्षापासून सभासद हिताचा बँकेत कारभार सुरू असून, तो यापुढे सुरू राहील, अशी ग्वाही शिक्षक बँकेचे चेअरमन बाळासाहेब सरोदे यांनी दिली.



शिक्षक बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभे निमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी शिक्षक नेते सुरेश निवडुंगे, राजकुमार साळवे, साहेबराव अनाप, विद्याताई आढाव, अर्जुन शिरसाठ, बाबा खरात, आर.टी. साबळे, राजू राहणे, किसन खेमनर, बाळासाहेब मुखेकर, राम वाकचौरे आदी नेते उपस्थित होते.

यावेळी शिक्षक बँकेचे व्हाईस चेअरमन रमेश गोरे यांनी सभासद कल्याण निधी मधून सभासदांच्या पाल्यांना पारितोषिके व आजारी सभासदांना पंचवीस हजार रुपये पर्यंत वैद्यकीय मदत केली असून, सभासदांचा वाढलेला मृत्युदर व वाढलेली कर्ज मर्यादा यामुळे सभासदांचा कर्ज निवारण निधी सध्या शिल्लक नाही.



## आश्वी बुद्रुक येथे युवक कार्यकर्ता मेळाव्यात डॉ. सुजय विखे यांचा विरोधकांवर टोला

# धर्माच्या नावावर विष कालवणे थांबवा

देशोन्नती वृत्तसंकलन

**संगमनेर :** मागील ७० वर्षात शिर्डी मतदारसंघातील कोणत्याही जाती अथवा धर्माला संरक्षणाची गरज पडली नाही. मात्र आज असं काय झालं की? प्रत्येकाला आपलं अस्तित्व धोक्यात वाटू लागलं आहे. महाराष्ट्र आणि शिर्डी मतदारसंघाबाहेर काय चालू आहे, त्याबद्दल मला काही माहित नाही. परंतु शिर्डी मतदारसंघात आपण सर्व जण एक आहोत. त्यामुळे धर्म आणि जातीच्या नावावर विष कालवणे सहन करणार नसल्याचा इशारा डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिला.

संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे युवक कार्यकर्त्यांशी संवाद साधताना माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. अशोकराव जऱ्हाड, नवनाथ ताजणे, भीमा शिंदे, अनिल कंगणकर, विजय म्हसे, अनिल म्हसे, संजय गायकवाड, सुनील जऱ्हाड, अनिल जऱ्हाड, विशाल वाकचौरे, महेंद्र जऱ्हाड, भाऊसाहेब खेमनर, सतीश म्हसे, प्रवीण गायकवाड, शरद चंद, गणेश जऱ्हाड, आनंद बालोटे, सुभाष होडगर, राजेंद्र होडगर, विशाल जऱ्हाड, प्रमोद जऱ्हाड, संपत भुसाळ आदिंसह मोठ्या प्रमाणात युवक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले की, ज्या दारुड्याला घरात आणि गावात कोणी विचारत नाही. तो मोबाईलवर एखादे स्टेटस ठेवतो आणि आपण गाव बंद ठेवतो. आपण सुशिक्षीत असूनही भरकटत चाललोय का? तुमचां शिक्षण घेऊन काय उपयोग झाला असा सवाल डॉ. विखे यांनी उपस्थित करत डॉक्टर असून जर मी भेदभाव मिटवू शकलो नाही तर माझ्या शिक्षणाचा काय उपयोग असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे मतदारसंघातील सामाजिक सलोखा बिघडणार नाही आणि मुलींची सुरक्षितता भंग होणार नाही यांची दक्षता घेण्याचे आवाहन केले.

### 'जनसेवा युवा मंच ॲंप'द्वारे मिळणार रोजगार

'जनसेवा युवा मंच ॲंप'बाबत माहिती देताना ते म्हणाले की, या ॲंपचा उपयोग युवकांचे संघटन, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये युवकांना रोजगाराच्या संधी, विविध अर्ज तसेच गणेश मंडळाची नोंदणी करण्यासाठी प्रामुख्याने उपयोग होणार आहे. १५ सप्टेंबरपर्यंत यांची नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन करताना नोंदणी करणारे युवक माझ्याबरोबर आयुष्यभर राहणार असल्याचे सांगितले. तसेच सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांनासाठी संघटनेत काम करणाऱ्या युवकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ग्वाही डॉ. विखे यांनी दिली.

# महानगरपालिका कर्मचारी युनियनच्यावतीने आ. जगताप यांचा सत्कार

देशोन्नती वृत्तसंकलन

**नगर :** अहमदनगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता तो मंजूर व्हावा यासाठी मनपा कर्मचारी युनियनचे पदाधिकारी सलग नऊ दिवस उपोषणास बसले होते, राज्य सरकारने सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावावा यासाठी आ. संग्राम जगताप यांनी पाठपुरावा केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मंजूर झाला असून आदेशाचे पत्र आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते आज पदाधिकाऱ्यांना सुपूर्त करण्यात आला, यावेळी युनियनच्या वतीने आ. संग्राम जगताप यांचा सत्कार करण्यात आला यावेळी जल अभियंता परिमल निकम, आस्थापना विभाग प्रमुख मेहर लहारे, युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सचिव आनंदराव वायकर . बाबासाहेब राशीनकर ,नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, बलराज गायकवाड़ , सागर सालुंके, अजय सौदे, प्रफुल लोंढे, अजित तारु, अंतवन क्षेत्रे , विजय कोतकर, बाळासाहेब व्यापारी, अनंत लोखंडे, भास्कर अकूबत्तीन, अकील सय्यद, सखाराम पवार, महादेव कोतकर, अमोल लहारे, दिपक मोहिते, आर. ए. देशमुख आदी उपस्थित होते.



## यंदा महालक्ष्मींचे आगमन अनुराधा नक्षत्रात


**नागपूर :** हिंदू पंचांगानुसार भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षांतील चतुर्थी तिथीला म्हणजेच ७ सप्टेंबर रोजी गणपती बाप्पाचे आगमन होईल. सध्या संपूर्ण राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. बाप्पाच्या आगमनाची अनेक जण आतुर झाले आहेत. बाप्पाच्या आगमनासह महिलांमध्ये गौराईच्या आगमनाचाही उत्साह महिलांमध्ये पाहायला मिळत आहे. यंदा १० सप्टेंबर रोजी गौरीचे आवाहन केले जाईल. तर ११ सप्टेंबर रोजी गौराईचे पूजन केले जाईल. तसेच १२ सप्टेंबर रोजी गौरी आणि गणपतीचे विसर्जन होईल. यावर्षी १० सप्टेंबर रोजी महालक्ष्मीचे कुळाचारा प्रमाणे आवाहन करून, शास्त्रोक्त पध्दतीने रितीवाजा परंपरेनुसार ११ सप्टेंबर रोजी महालक्ष्मी पूजन, महानैवेद्य तर १२ सप्टेंबर रोजी महालक्ष्मी विसर्जन करावे, असे आंतरराष्ट्रीय ज्योतिषाचार्य डॉ. अनिल वैद्य यांनी सांगितले.

# विद्यार्थिनींच्या संरक्षणाकरिता पोलिस दिदी पोलिस काका उपक्रम नव्याने हाती घेणार

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली :** जिल्ह्यात महिला व मुलींच्या सुरक्षेतवर भर दिला जात असताना प्रामुख्याने विद्यार्थीनींना संरक्षण देण्याच्या उद्देशाने शाळांमध्ये पोलिस दिदी व पोलिस काका उपक्रम नव्याने हाती घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

जिल्हा पोलिस अधिक्षकपदी श्रीकृष्ण कोकाटे रूजू झाल्यानंतर त्यांनी ६ सप्टेंबर रोजी प्रथमच पत्रकारांशी वार्तालाप केला. घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना त्यांनी पुढे सांगितले की, जिल्ह्यात निजामकालीन पोलिस ठाणे व वसाहतींचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे प्रामुख्याने या बाबीकडे लक्ष घालून जुन्या इमारती व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न टप्याटप्याने मार्गी लावला जाणार यासाठी हट्टा, औंढा नागनाथ, बासंबा पोलिस ठाण्याच्या इमारती व त्यानंतर वसाहतीचा प्रश्न हाती घेतला जाणार, जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण म्हणावे तसे नसून परंतु रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाई करून ही गुन्हेगारी घटविण्याचा प्रयत्न केला जाणार, अनेक ठिकाणची सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करण्याकरीता डीपीटीसी, स्थानिक लोकप्रतिनिधी व व्यापाऱ्यांना प्रोत्साहीत करून अनेक ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याकरीता प्रयत्न केले जाणार, जिल्ह्यातील विद्यार्थीनींना संरक्षण देण्याच्या उद्देशाने पोलिस दिदी व पोलिस काका उपक्रम नव्याने हाती घेण्यात येणार असून शाळांमध्ये पोलिस दिदी व पोलिस काकांचे फोटो आणि मोबाईल नंबरही लावले जाणार आहेत. जिल्ह्यात पोलिस कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या लक्षात घेता शासनाकडे त्याबद्दल पाठपुरावा केला जाणार आहे. रात्रीच्या गस्तीसाठी पंचींग सिस्टीम यापुढेही अशीच सुरू ठेवली जाणार असल्याची माहिती कोकाटे यांनी दिली.



### जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची माहिती

हिंगोली शहरातील वाहतूक संदर्भात अनेकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याने प्रामुख्याने वाहतूक नियंत्रणावर अधिक लक्ष केंद्रीत केले जाणार असल्याचे सांगून उद्यापासून सुरू होणारा गणेशोत्सव त्यानंतर अनेक सण व उत्सवाच्या निमित्ताने सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे उपस्थित होते.

# खरबी बंधारा निविदा रद्द करण्यास आमदार बांगर यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली :** खरबी वळण ते इसापूर जलायश पाणी वहन प्रणाली बांधकामाच्या निविदा प्रसिद्ध झाल्या आहेत. यामुळे इसापूर धरणाद्वारे पाणी नांदेड जिल्ह्याला जाणार असल्याने या निविदा रद्द कराव्यात यासाठी आमदार संतोष बांगर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले.



हिंगोली तालुक्यातील खरबी येथे कयाधु नदीवर बंधारा बांधून त्या ठिकाणावरून नदीचे पाणी इसापूर धरणाकडे वळविले जाणार आहे.उर्ध्व पैनगंगा प्रकल्प कार्यालयाच्या वतीने सदरील काम केले जाणार असून त्यासाठी ३ सप्टेंबरला निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.तसेच इसापूर जलाशयाचे पाणी नांदेड ला नेण्याचे प्रयोजन केले जात आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्याचा वाळवंट होणार असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा शेती सिंचनाचा प्रश्न निर्माण होणार असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील निर्माण होणार असल्याने हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची व नागरिकांची अडचण लक्षात घेता सदरील निविदा तातडीने रद्द करण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आ. संतोष बांगर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# किनवट पोलिसांनी अवैध धंद्यावर टाकला छापा

## 13 लाखाच्या गुटख्यासह वाहन केले जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**किनवट (नांदेड) :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत किनवट पोलिसांनी गुटख्याची वाहतूक करणारे वाहन व १३ लाख ३८ हजार रुपये किमतीचा गुटख्याचा साठा असा एकूण २० लाख ३८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

किनवट ठाण्याचे पोनि बिर्ला यांच्यासह पोउपनि चाँद व पोलीस अंमलदार किनवट हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना आंबेडकर चौकात आले असता किनवट शहरामध्ये बसस्थानक मार्गावरून बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. २६/सी.एच. १४४३ मध्ये गुटखा घेवुन येत असल्याची माहती मिळाली. या माहितीवरून



सदर वाहनास थांबवुन चौकशी केली असता आरोपी शेख वसीम शेख रजाक, रा. हिमायतनगर याने वाहनात विना परवाना बेकायदेशिररीत्या शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपणीचा १३ लाख ३८ हजार रुपये किमतीचा गुटखा व ७ लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण २० लाख ३८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोउपनि चाँद यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पथकात पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधीक्षक खंडेराय धरणे, अप्पर पोलिस अधीक्षक सुरज गुरव, किनवटचे उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्यादर्शनाखाली पोनि बिर्ला, पोउपनि चाँद, पोकॉ कुडमेथे, होमगार्ड त्रिमनवार, राठोड, उपलेंचवार, येडके, शेख यांचा समावेश होता.

# भरधाव ऑटोची दुचाकीस धडक

## शिक्षकाचा जागीच मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली :** कळमनुरी तालुक्यातील पांगराशिंदे ते उमरा मार्गावर म्हैसगव्हाण शिवारात भरधाव ॲटोने दुचाकीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात एका शिक्षकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी ६ सप्टेंबरला दुपारी घडली आहे. शिवाजी नागोराव इबितदार (५५ रा. नांदेड) असे शिक्षकाचे नांव असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड येथील शिवाजी इबितदार हे कळमनुरी येथील निवासी मुकबधीर विद्यालयात शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. ६ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास हिंगोली येथे बैठक असल्यामुळे ते नांदेड येथून त्यांच्या दुचाकी वाहनावर हिंगोलीकडे येत होते. यावेळी पांगरा शिंदे ते उमरा मार्गावर म्हैसगव्हाण पाटीजवळ भरधाव ॲटोने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात इबितदार हे रस्त्यावर कोसळले. त्यांच्या डोक्याला जबर दुखापत असल्यामुळे रक्तस्त्राव सुरु झाला. रुपुर पाटीवरील काही गावकऱ्यांना घटनास्थळी धाव घेऊन इबितदार यांना उपचारसाठी पोतरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकिय अधिकाऱ्यांनी जाहिर केले. या अपघाताची माहिती मिळताच आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णूकांत गुठ्ठे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मधुकर नागरे, जमादार पंढरी चव्हाण, प्रविण चव्हाण यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी ॲटो चालकाला ताब्यात घेतले आहे.

# नगर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अनिल लगड, तर सचिवपदी संदीप रोडे यांची बहुमताने निवड

देशोन्नती वृत्तसंकलन

**अहमदनगर :** अहमदनगर पत्रकार संघाच्या चुरशीने मात्र तेव्हढ्याच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंट (पीपीएफ) पॅनलच्या उमेदवारांना घवघवीत यश मिळाले आहे. जेष्ठ पत्रकार शिवाजी शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंटचे उमेदवार अनिल लगड (दै. सकाळ) यांची अध्यक्षपदी तर संदीप रोडे (दै. पुढारी) यांची सचिवपदी बहुमताने निवड झाली. तसेच कार्यकारिणीसह इतर १७ जागांपैकी १३ पदावर

### देशोन्नतीचे राजेंद्र त्रिमुखे यांची कार्यकारणीवर निवड

पीपीएफचे उमेदवार निवडून आले. यात देशोन्नतीचे नगर जिल्हा प्रतिनिधी जेष्ठ पत्रकार राजेंद्र त्रिमुखे यांची कार्यकारणी सदस्यपदी बहुमताने निवड झाली. अहमदनगर शहरात लोकशाही मार्गाने झालेल्या पत्रकारांच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून होते. या निवडणुकीत शिवाजी शिर्के यांच्या नेतृत्वाखाली प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंट (पीपीएफ) आणि सुधीर लंके यांच्या नेतृत्वाखाली डेमॉक्रेटिक मीडिया फ्रंट (डीएमएफ) या



दोन पॅनलसह संघाचे काही सदस्य अपक्ष पद्धतीने निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. खजिनदारपदी पीपीएफ पॅनेलचे सुनील चोभे (दै. नगर सह्याद्री) यांची बिनविरोध निवड झाली होती. गुरुवारी पार पडलेल्या निवडणुकीत पीपीएफ पॅनलचे अनिल लगड अध्यक्ष, संदीप रोडे सचिव या पदासह उपाध्यक्षपदी सुशील थोरात (साम न्यूज), सहसचिवपदी दौलत झावरे (दै. सकाळ), न्यूज चॅनेल प्रतिनिधीपदी सुनील भोंगळ (एबीपी माझा), फोटोग्राफर प्रतिनिधीपदी समीर मण्यार यासह, सर्वसाधारण कार्यकारणीवर अल्ताफ कडकाले (दै. सकाळ), बाळासाहेब धस (दै. केसरी), राजेंद्र त्रिमुखे (दै. देशोन्नती), सचिन दसपुते (दै. सार्वमत), संदीप जाधव (दै. नगर टाईम्स), सूर्यकांत वरकड (दै. पुढारी) हे सर्व पीपीएफ'चे उमेदवार बहुमताने निवडून आले. उपाध्यक्ष पदासाठी दोन्ही पॅनल मधील राजेंद्र झोंड आणि चंद्रकांत शेळके यांना समान मते मिळाली. डेमोक्रेटिक मीडिया फ्रंट (डीएमएफ)चे चंद्रकांत शेळके (दै. लोकमत) यांची चिठ्ठी निघाल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले. डेमोक्रेटिक पॅनेलचे विजय सांगळे (दै. आकर्षण) सहखजिनदार, अरुण वाघमोडे (दै. लोकमत) सर्वसाधारण कार्यकारिणी सदस्य आणि अन्सार सय्यद (फौजदार टाईम्स) साप्ताहिक प्रतिनिधी पदी निवडून आले.

# हिंगोली शहर पाणी पुरवठा प्रकल्पासाठी ८४.५० कोटी

## योजनेला शासनाच्या नगर विकास विभागाची मान्यता

**हिंगोली :** नगरोत्थान महाअभियानांतर्गत हिंगोली शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पास ८४ कोटी ५० लाख रूपयाच्या योजनेला शासनाच्या नगर विकास विभागाने मान्यता दिली आहे.

याबाबत ६ सप्टेंबरला काढलेल्या शासन निर्णयात नगरोत्थान अभियानांतर्गत हिंगोली नगर परिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्पा संदर्भात राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीकडे सादर करण्यात आला होता. त्याला मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांनी तांत्रिक मान्यता दिली असून त्या अनुषंगाने समितीने १६ जुलै रोजी झालेल्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारशी नुसार या प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. योजनेची एकूण मंजूर किंमत ८४ कोटी ५० लाख असून त्यामध्ये राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान ९० टक्के प्रमाणे ७६ कोटी ५ लाख रूपये तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सहभागात १० टक्के प्रमाणे ८ कोटी ४५ लाख रूपये या प्रकल्पासाठी लागणार आहेत. हिंगोली नगर परिषदेला तब्बल ८४ कोटी ५० लाख रूपये किंमतीची पाणी पुरवठ्याकरिता मंजुरी मिळाल्याने भविष्यातील पाणी टंचाईची समस्या दुर होणार आहे.




**मुंबई :** मानखुर्द येथील वॉर्डच्या १४३ माजी नगरसेविका ऋजुता तारी यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. तारी यांच्या पक्ष प्रवेशाने उबाठा गटाला खिंडार पडले असून आतापर्यंत त्यांचे ५५ नगरसेवक मूळ शिवसेनेत परतले आहेत.

# थोरात कारखान्यावर गणेश उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन

**संगमनेर :** काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते तथा मा. महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्यावर अमृत सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त ७ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२४ या काळात अत्यंत दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सांस्कृतिक मंडळाचे उपाध्यक्ष जगन्नाथ घुगरकर व कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणेतून अमृत सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गणेश उत्सव काळामध्ये दरवर्षी दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होते. यावर्षी शनिवार दिनांक ७ सप्टेंबर २०२४ ते सोमवार दिनांक १६ सप्टेंबर २०२४ या काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी ७ सप्टेंबर रोजी स. ९ वा. श्री गणेशाची मिरवणूक व स्थापना होणार आहे. तर रविवारी सायंकाळी ८ वा. झी टॉकीज गजर कीर्तनाचा या कार्यक्रमातील कीर्तनकार ह.भ.प. ॲड. शंकर महाराज शेवाळे (पुणे) यांचे जाहीर कीर्तन होणार आहे. सोमवार ९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वा. महाराष्ट्रातील मराठी संस्कृतीचा लोकजागर अशी आमची माय मराठी हा दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. तर मंगळवारी १० सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे आयोजन केले आहे. तर बुधवारी ११ सप्टेंबर रोजी संगीत खूर्ची व चमचा लिंबू हा महिलांसाठी कार्यक्रम होणार आहे. गुरुवार १२ सप्टेंबर रोजी रात्री ८ वा. चित्रपट अभिनेते वैभव मांगले, प्रसिद्ध अभिनेत्री भार्गवी चिरमुले, सुकन्या काळन, निमिष कुलकर्णी, विकास चव्हाण यांच्या अभिनयाने सजलेले मर्डरवाले कुलकर्णी हे सुपरहिट नाटक होणार आहे.



# ३५ हजार महिलांच्या उपस्थितीत इंदिरा महोत्सव ठरला संस्मरणीय

देशोन्नती वृत्तसंकलन

**संगमनेर :** राज्याचे नेते आणि संगमनेरचे आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगत असलेल्या संगमनेर तालुक्यातील प्रत्येक कुटुंबातील महिला आर्थिक दृष्ट्या अधिक सक्षम व्हावी याकरता त्यांना गृह उद्योग रोजगार व स्वयंरोजगाराच्या मार्गदर्शन व मदतीसाठी डॉ. जयश्री थोरात यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या इंदिरा महोत्सवात तालुक्यातील ३५ हजार महिलांनी सहभाग नोंदवला असून यामुळे अनेक महिलांना गृह उद्योगासाठी मोठी प्रेरणा मिळाली असून महिलांच्या या अभूतपूर्व उपस्थितीने इंदिरा महोत्सव संस्मरणीय ठरला असल्याची माहिती देण्यात आली आहे.

कारखाना कार्यस्थळावर अत्यंत दिमाखदार पद्धतीने या इंदिरा महोत्सवाचे आयोजन केले होते. यावेळी प्रशस्त जर्मन हँगर पद्धतीचा मंडप ,सुसज्ज बैठक व्यवस्था ,भोजन कक्ष, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या सहभागातील प्रात्यक्षिक दाखवणारे प्रदर्शन, मनोरंजनाचे खेळ, भक्ती संगीत, शालेय विद्यार्थिनीचे सांस्कृतिक कार्यक्रम, उखाणे स्पर्धा आणि पैठणीचा खेळ यामुळे हा महोत्सव लक्षात राहणारा ठरणार आहे.

### १०० भाग्यवंत महिलांना मिळाल्या पैठणी

कापसे पैठणीच्या वतीने इंदिरा महोत्सवात सहभागी झालेल्या भाग्यवंत महिलांना १०० पैठणी देण्यात आला. यावेळी सर्वांना कुपन देण्यात आले. लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठ्या टाकून या १०० महिलांची निवड झाली. पैठणी जिंकल्यानंतर सर्व महिलांनी नृत्य आणि धमाल करून आपला आनंद साजरा केला.

### रोजगार मार्गदर्शनाचा उद्देश सफल झाला : डॉ.जयश्री थोरात

आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका हा सुमारे सात लाख दुधाचे दररोज उत्पादन करत असून यामध्ये महिलांचे मोठे योगदान आहे कुटुंबाच्या आर्थिक प्रगती बरोबर त्या घरातील महिला अधिक सक्षम व समृद्ध होताना त्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला हातभार लागावा याकरता रोजगार व स्वयंरोजगार यासाठी आयोजित केलेल्या या इंदिरा महोत्सवात तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले असून यातून सर्व महिलांना उद्योग व्यवसाय करण्याची प्रेरणा मिळाली असल्याने महोत्सवाचा उद्देश सफल झाला असल्याचे आयोजक कॅन्सरतज्ञ डॉ. जयाताई थोरात यांनी म्हटले आहे.

### रोजगारारासाठी महिलांना संधी निर्माण



सह्याद्री ॲग्रो, टू ब्रदर्स, कृषी विद्यापीठ, बारामती ?ग्रो, लीज्जत पापड ,कापसे पैठणी, शासकीय कृषी व ऊर्जा विभाग यांसह अनेक कंपन्या यामध्ये सहभागी झाल्या होत्या. याचबरोबर सत्यजित हंगे, पौर्णिमा शिरसकर, केंद्रीय ऊर्जा विभागाचे भट्टे, मनीषा कटके, बाळासाहेब कापसे यांसह अनेक उद्योजकांनी उपस्थित राहून महिलांना उद्योग व्यवसाय सुरू करणे बाबत मार्गदर्शन केले. तसेच यावेळी सर्व महिलांची नोंदणी करून त्यांना आवडीच्या व्यवसायामध्ये रोजगाराच्या संधींची माहिती देत. त्यासाठी करावयाची कागदपत्रे, बँकिंगचा पाठपुरावा, मार्केटिंगची संधी आणि त्यांनी तयार केलेल्या उत्पादित मालाला थेट कंपन्याशी समन्वय करून देण्यात आला. यामुळे महिलांमध्ये उद्योजक होण्यासाठी मोठी मानसिकता निर्माण झाली. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात पहिल्या दिवशी १५००० तर दुसऱ्या दिवशी २०००० महिला भगिनींनी सहभाग घेतला.

# तीन गावांनी बसविला एक मोरया!

**कौतूकास्पद** ३८ ठिकाणी श्रींची स्थापना जल्लोषात





सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यात शनिवारी रात्री आठ वाजेपर्यंत तीन गावात एक गाव एक गणपतीची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी दिली आहे सोयगाव पोलीस ठाण्याचे हद्दीत ५१ गावांपैकी तीन गावात हा एक गाव एक गणपती संकल्पना राबविण्यात आली आहे दरम्यान तालुक्यातील सर्वच ठिकाणी मोठया उत्साहात रात्री उशिरापर्यंत श्रींची आगमन होऊन स्थापना करण्यात आली होती यामध्ये हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे दर्शन घडवीत वेताळवाडी गावात एक गाव एक गणपती संकल्पना राबविण्यात सोयगाव पोलिसांना यश आले असून वेताळवाडी,तिडका आणि पहुरी या तीन गावात रात्री उशिरापर्यंत एक गाव एक गणपती संकल्पना राबविण्यात आली होती दरम्यान रात्री उशिरा आठ वाजेपर्यंत सोयगाव शहरासह हद्दीतील ५१ पैकीं ३८ गावात उत्साहात व शांततेत श्रींची स्थापना करण्यात आली आहे अजूनही श्रींची स्थापनेचा उत्साह शिगेला पोहचला आहे

अजिंठा डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या वेताळवाडी गावात हिंदू-,मुस्लिम एकतेचे दर्शन घडवून जिल्ह्याला संदेश देत या गावात एक गाव एक गणपती ची स्थापना करण्यात आली आहे.

हा सोयगाव तालुक्याचा आदर्श ठरला आहे दरम्यान तालुक्यात सायंकाळी चार वाजेपासून श्रींच्या आगमनाची उत्साह शिगेला पोहचला रात्री उशिरापर्यंत श्रींच्या स्थापना सुरू होती दरम्यान घरोघरी विधिवत पूजा करून श्रींची स्थापना करण्यात आली होती सोयगाव शहरात रात्री आठ वाजेपर्यंत पाच सार्वजनिक गणेश मंडळांनी शांततेत श्रींची स्थापना करण्यात आली होती पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रजाक शेख,सतिष बडे यांच्यासह १९ पोलीस कर्मचारी १५ गृहरक्षक दलाचे जवान असा ३८ जणांचा बंदोबस्त सोयगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ५१ गावात तैनात करण्यात आला होता.यावेळी पोलीस निरीक्षक पंकज बारवाल उपनिरीक्षक रजाक शेख सतिश बडे जमादार राजू बर्डे,रवींद्र तायडे,अजय कोळी,संदीप सुसर,गजानन दांडगे आदी लक्ष ठेवून आहेत.

# चाहुर तांडा येथील पुल गेला वाहून!

**अस्मानी :** ग्रामस्थांना होतेय गैरसोय



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील चाहुर तांडा येथील ओढ्यावरील पूल मागच्या आठवड्यात वाहून गेल्याने गावातील ये जा करण्यास अडथळा येत असून संमधीत कार्यालयाने तो तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी होत आहे.

या विषयी मिळालेली माहिती अशी की तालुक्यातील तालखेड येथुन चाहुर तांडा ,खेरडा खुर्द ,व शहापूर मजरा गावा साठी मागच्या पाच सहा वर्षा पूर्वी संमधीत गुत्तेदाराने केला होता याच रस्त्यावर चाहुर तांडा शिवारात खंडोबा चा मोठा ओढा येतो याच ओढ्यावर दळण वळणा साठी पूल बांधण्यात आला होता हाच पूल मागच्या पावसात पूर्ण पणे वाहून गेल्याने त्या गुत्तेदाराचे पितळ उघडे पडले आहे ज्या वेळेस या पुलाचे काम सुरू होते त्या वेळेस गावातील नागरिकांनी सदरील पुलाचे काम दर्जेदार व्हावे म्हणून त्या गुत्तेदाराला बजावले होते मते या पुलाचे काम निकृष्ट व थातुरमातुर करून बिल उचलून त्या गुत्तेदाराने आपले उखळ पांढरे केले .हा पुल पावसाच्या पाण्याने वागून गेल्याने गावातील व परिसरातील नागरीकांची गैरसोय होत आहे गावातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या भागात आहेत त्या मूळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेऊन हा रस्ता दुरुस्त करून द्यावी अशी मागणी या भागातील नागरिकांतून होत आहे.दोन दिवसापूर्वी या पुलाचा पंचनामा या भागातील तलाठ्यां कडून झाल्याची माहिती आहे.

# नाथ प्रतिष्ठान कडून दहा हजारांची मदत!

**दिलासा:** धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत एकत्रित वितरण



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी परळी वैजनाथ शहरात मागच्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सरस्वती नदीला आलेल्या पुरात ५५० पेक्षा अधिक कुटुंब बाधित होऊन त्यांच्या घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी साहित्य धान्य आदींचे नुकसान झाले होते. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना प्रतिक कुटुंब दहा हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत रविवारी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे.

आपत्ती व्यवस्थापनाच्या तातडीच्या आपत्ती निवारण निधीतून देखील प्रशासनाच्या वतीने या प्रत्येक बाधित कुटुंबाला नियमाप्रमाणे प्रत्येकी ५००० रुपये याप्रमाणे तातडीची मदत देखील धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे अशी माहिती तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी दिली आहे. सरस्वती नदीला आलेल्या पुरानंतर धनंजय मुंडे यांनी या भागात प्रत्यक्ष जाऊन नागरिकांच्या भेटी घेत त्यांना धीर व दिल्यास दिला होता तसेच प्रशासनाला तात्काळ मदत करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

शासनाच्या नियमानुसार पुराच्या पाण्याने नुकसान होऊन घरातील भांडी कपडे धान्य आदींचे नुकसान झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपये मदत दिली जाते, शासनाच्या बरोबरीने किंबहुना त्याहूनही दुप्पट मदत नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने धनंजय मुंडे यांच्याकडूनही दिली जात आहे. परळी वैजनाथ पान २ वर...

# केज पंचायत समितीत काळाबाजार?

**बोंबला:** कामे अर्धवट पण बील होवू लागले अदा!




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समितीच्या बांधकाम विभागाच्या अधिकार सासवडे मॅडम एमआरजिऐसच्या कामात चाललंय तरी काय असा प्रश्न उपस्थित नागरिकांना उपस्थित होत आहे कारण अनेक कामे अर्धवट असतात तर काही कामे झालेली नसतात तरी सुद्धा कामाची रक्कम जमा करण्यात येत मग एमआरजिएस कामात चाललंय तरी काय तसेच पंचायत समिती येथील प्रत्येक विभागातील अधिकारी बीडीओ पासुन रोजगार सेवक का पर्यंत कमीशन एजन्ट सारखे वागत असलेल्याचे समजले जाते आहे त्यामध्ये केज पंचायत समितीतील बांधकाम विभागाचे अधिकारी ऐमआरजिऐसच्या कामात बिडीओ ते रोजगार सेवका पर्यंत यांना तर टक्केवारी घेतल्याशिवाय सही सुध्दा करण्यास मुळावर येत आहे किंवा टक्केवारी घेतल्याशिवाय एखाद्या कामाच्या कागदपत्रावर सही करत नाहीत असे समजले जाते आहे. पंचायत समीत मध्ये बांधकाम विभागाचे अधिकारी जनु काय कमीशन एजन्ट सारखे टक्केवारी घेऊन काम करत आहेत का काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे त्या अधिकाऱ्याला शासन पगार देत नाही का असाही प्रश्न उपस्थित होत आहे कारण पंचायत समितीतीतील बांधकाम विभागाचे कुठल्याही प्रकारचे पान २ वर...

# बीडमध्ये रिपाइंची महत्वपूर्ण बैठक

**किशन तांगडे:** बैठकीला उपस्थित रहावे



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ)ची अतिशय महत्वपूर्ण बैठकिचे आयोजन दि.०९/०९/२०२४,वार -सोमवार रोजी ठिक ११:३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,नगर रोड,बीड येथे करण्यात आले असून या बैठकीमध्ये सध्या महाराष्ट्रातील घडामोडी तसेच रिपाई ची पुढील दिशा, पक्ष वाढीसाठी करावयाचे काम यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीसाठी रिपाई चे युवा प्रदेश अध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब हे उपस्थित राहून सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.या बैठकीस जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी/कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिद्धेश्वर गणेश मंडळाची उत्साहात स्थापना

**परंपरा:** अरुण म्हस्केंच्या हस्ते स्थापना



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील सावता नगर येथे सिद्धेश्वर गणेश मंडळाच्या गणपती ची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली रात्रीच्या सुमारास नगरसेवक अरुण म्हस्के यांच्या हस्ते सपत्नीक सिद्धेश्वर गणेश मंडळाच्या श्रीगणेशाची स्थापना करण्यात आली यावेळी मंडळाचे सदस्य व सावता नगर भागातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, वर्षभर आतुरतेने वाट पाहत असलेल्या भाविक भक्तांची प्रतीक्षा अखेर संपली. आपल्या पान २ वर...

# रिक्त असलेल्या पदाचा प्रश्न सुटला!

**बदली:** आष्टी तहसीलदार म्हणून वैशाली पाटील




कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील एक महिन्यापासून रिक्त असलेल्या आष्टीच्या तहसीलदार पदाचा पदभार अखेर नवनियुक्त तहसीलदार वैशाली नालगोंडा पाटील यांनी स्वीकारला आहे .आष्टी तहसील कार्यालयात यापूर्वी कार्यरत असलेले तहसीलदार प्रमोद गायकवाड यांची प्रशासकीय बदली झाल्यावर त्यांच्या जागी नागपूर येथील वैशाली नालगोंडा पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र, महिना उलटूनही त्यांनी पदभार स्वीकारला नाही. त्यामुळे सर्वसामान्यांची कामे खोळंबली होती. अखेर महिनाभराच्या प्रतीक्षेनंतर तहसीलदार पाटील यांनी आष्टीच्या तहसीलदार म्हणून पदभार स्वीकारला. याप्रसंगी पान २ वर...

### प्रलंबित प्रकरणे, विश्वास संपदान आव्हान ?

आष्टीच्या तहसीलदार म्हणून काम करत असताना पाटील यांना महसूल विभागातील दैनंदिन कामांसह रेशनिंग वाटप, अवैध वाळू उपसा, गौण खनिज उत्खनन, प्रलंबित प्रकरणे जलद गतीने मार्गी लावणे, यासारख्या कामांवर लक्ष केंद्रित करावे लागणार असून, याशिवाय, प्रामुख्याने आजी-माजी आमदारांचा समतोल राखत त्यांचा विश्वास संपदा करणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

# मुंदडा कुटुंबाची कोट्यवधींची प्रोपर्टी?

**मागणी:** ईडीची पीडा लावण्याची होतेय चर्चा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघातीच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांची कोट्यवधी रुपयांची प्रोपर्टी असल्याचे समजले जाते आहे परंतु आमदार नमीता मुंदडा यांचा इनकम शोर्स काय आहे एखादा कारखाना,सुतगीरनी अशा प्रकारचा कुठलाही इनकम शोर्स नसताना कोट्यवधी रुपयांची प्रोपर्टी आली कुठून असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण मुंदडा कुटुंबाचे पेट्रोलपंप ,पुणे मुंबईत मोठे मोठे बंगले आहेत तर एवढी प्रोपर्टी मुंदडा कुटुंबाकडे आली कुठून एखाद्या आमदारांचा कुठल्याही प्रकारचा इनकम शोर्स नसताना कोट्यवधी रुपयांची प्रोपर्टी असणाऱ्यां मुंदडा कुटुंबाने केज अंबाजोगाई मतदार संघ लुटुन तर कोट्यवधी रुपयांची प्रोपर्टी उपलब्ध केली नाही ना असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण सर्वसामान्य राजस्थानी शेठजीची कुठल्याही प्रकारचा इनकम शोर्स नसताना पान २ वर...

**दिलासा** सुषमा अंधारेंनी मानले धनंजय मुंडेंचे आभार

# परळीतील पूरबाधितांना थेट आर्थिक मदत

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ शहरात मागील आठवड्यात पुराने बाधित झालेल्या जवळपास ५७० पेक्षा अधिक कुटुंबांना पालकमंत्री धनंजय मुंडेंनी ते अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून प्रत्येकी १० हजार रुपयांची आर्थिक मदत रविवारी देण्याचे घोषित केल्यानंतर आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमाताई अंधारे यांनी धनंजय मुंडे यांच्या या निर्णयाचे स्वागत करत आभार मानले आहेत.

मागील आठवडयात झालेल्या अतिवृष्टीमुळे परळी शहरातील सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे रहिमत नगर, बरकत नगर, भीमा नगर इत्यादी भागातील बऱ्याच घरांमध्ये पाणी शिरून कपडे, धान्य, भांडी आदींचे नुकसान झाले होते. त्यानंतर तिथे धनंजय मुंडे यांनी जाऊन पाहणी करत नागरिकांना दिलासा दिला होता.

**परळीत अनेकांचे संसार पाण्यात**

**प्रा.सुषमाताई अंधारे :** नामदार साहेब त्यांना मदत करा



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळीत नुकत्याच झालेल्या पुराच्या पाण्यात अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले आहेत नामदार

येथील पुरग्रस्त भागातील नागरिकांच्या गाठीभेटी घेताना बोलत होत्या.

यावेळी प्रा सुषमा अंधारे यांनी पुराच्या

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शासकीय नियमानुसार तहसील कार्यालयाकडून ता बाधित कुटुंबांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत करण्यात येत असुन या मदतीच्या दुप्पटीने धनंजय मुंडे यांनी या कुटुंबांना मदत जाहीर केली असुन, शिवसेना नेत्या (ठाकरे गट) सुषमाताई अंधारे यांनी या निर्णयाचे सोशल मीडियावर पोस्ट करत स्वागत केले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून पूरबाधितांना आर्थिक मदत करत असल्याबद्दल या रचनात्मक व सकारात्मक कृतीचे सुषमाताई अंधारे यांनी स्वागत करत धनंजय मुंडे यांच्या सहनात प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांचेही अभिनंदन व आभार मानले आहेत. दैनिक पुण्यभूमीच्या आजच्या अंकात देखील नामदार साहेब त्यांना मदत करा या मथळ्याखाली प्रा सुषमा अंधारे यांची बातमी प्रकाशित झाली होती

# नगर पत्रकार संघाच्या निवडी जाहीर

**कार्यक्रम:** जिल्हाध्यक्ष अनिल लगड तर सदस्यपदी राजेंद्र त्रिमुखे





राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

अहमदनगर पत्रकार संघाच्या चुरशीने मात्र तेव्हढ्याच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंट (पीपीएफ) पॅनलच्या उमेदवारांना घवघवीत यश मिळाले आहे. जेष्ठ पत्रकार शिवाजी शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंटचे उमेदवार अनिल लगड यांची अध्यक्षपदी तर संदीप रोडे यांची सचिवपदी बहुमताने निवड झाली. तसेच कार्यकारिणीसह इतर बहुतांशी पदावर पीपीएफचे उमेदवार निवडून आले. अहमदनगर शहरात अनेक वर्षानंतर लोकशाही मार्गाने झालेल्या पत्रकारांच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून होते. निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह प्रेस फ्रंट(पीपीएफ), डेमॉक्रॅटिक मीडिया फ्रंट(डीएमएफ)या दोन पॅनलसह संघाचे काही सदस्य अपक्ष पद्धतीने निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. खजिनदारपदी चोबे यांची बिनविरोध निवड झाली होती. गुरुवारी पार पडलेल्या निवडणुकीत पीपीएफ पॅनलने लगड अध्यक्ष, रोडे सचिव या पदासह उपाध्यक्षपदी सुशील थोरात, सहसचिवपदी दौलत झावरे, न्यूज चॅनेल प्रतिनिधीपदी सुनील भोंगळ, फोटोग्राफर प्रतिनिधीपदी समीर मण्यार यासह, सर्वसाधारण कार्यकारणीवर अल्ताफ कडकाले, पान २ वर...